# पर्यावरणपूरक गणेशोत्सवामध्ये सहभाग

समाजशास्त्र आणि एन.एस.एस. विभागाच्या वतीने गणेशमूर्ती विसर्जनाच्या (दिनांक: १४/०९/२०२१) पर्यावरण पूरक उत्सावामध्ये सहभाग नोंदविला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तसेच पर्यावरणाच्या संरक्षणासाठी कोल्हापूर महानगरपालिकेने प्रत्येक भागामध्ये काहीलीची व्यवस्था केली होती. यामध्ये समाजशास्त्र विभागाच्या वतीने कदमवाडी व जाधववाडी परीसरामध्ये घरोघरी जाऊन गणपती जलकुंडामध्येच विसर्जन व गणपती दान करण्यासाठी आवाहन करण्यात आले आणि ३२ गणपती गोळा करून त्याचे विसर्जन न करता ते दान करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील एन.एस.एस.विभागाच्या वतीने याठिकाणी जमा झालेले किंवा विखुरलेले निर्माल्य गोळा करण्यात आले.या परिसराची विशेषतः गणेश विसर्जनासाठी ठेवलेल्या काहीलीच्या परिसरातील स्वच्छता करण्यात आली .

पर्यावरणपूरक गणेशोत्सवामध्ये दोन्ही विभागातील विद्यार्थी अक्षय वाघमारे ,धनश्री कांबळे ,अभिषेक रावल, दुधानी गुरुदीपसिंग, सुर्यकांत शिरढोण, संतोष मोरे, अनिरुद्ध येसरे, अभिजित बनसोडे, रविराज कांबळे आदींनी सहभाग नोंदविला. तसेच या कार्यक्रमाचे नियोजन डॉ .कन्नाडे एम. के आणि प्रा .लवंगारे जी. एम यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एस. डुबल सर, उपप्राचार्य डॉ. किल्लेदार व्ही. व्ही यांनी केले .

प्रा .लवगारे जी. एम
एन.एस.एस.विभाग प्रमुख

डॉ .कन्नाडे एम. के
समाजशास्त्र विभागप्रमुख

प्र. प्राचार्य
राजर्षी छ. शाहू कॉलेज,
कोल्हापूर